


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ००५ ● पुणे ● रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# शरद पवार फोडाफोडीच्या राजकारणाचे आद्यसंत

## राज ठाकरे यांची टीका; मनसेचे उमेदवार गणेश भोकरे यांच्या प्रचारार्थ कसब्यात सभा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"गेल्या पाच वर्षातील राजकारण आणि नेतेमंडळींचे वागणे पाहता किळस येते आहे. कोण कोणाच्या मांडीवर बसतेय, याचा थांगपत्ता लागत नाही. मते एकाच्या नावाने मागायची आणि सत्ता वाटेल त्या पद्धतीने उपभोगायची, अशी स्थिती सध्या आहे. हे असेच चालू राहिले, तर येत्या काळात महाराष्ट्राचे आणखी वाटोळे होईल. फोडाफोडीच्या या राजकारणाचे शरद पवार हे आद्यसंत आहेत," अशी टीका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. छत्रपती शिवराय आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा वारंवार अपमान करणाऱ्या हाताला (काँग्रेसला) आपण निवडून देणार आहात का? असा सवालही ठाकरे यांनी उपस्थित केला. तसेच मला खुर्चीचा किंवा सत्तेचा सोस नाही, तर महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करायचेय, म्हणून माझ्या हाती एकदा सत्ता द्या, अशी साद ठाकरे यांनी घातली. कसबा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अधिकृत उमेदवार गणेश भोकरे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत राज ठाकरे बोलत होते. फडके हौद चौकात झालेल्या सभेवेळी मनसेचे नेते व प्रवक्ते अविनाश अभ्यंकर व अनिल शिदोरे, उमेदवार गणेश भोकरे, मनसेचे प्रदेश सरचिटणीस रणजित शिरोळे व ॲड. गणेश सातपुते, मनसे नेते राजेंद्र उर्फ बाबू वागस्कर, महिला सेनेच्या शहराध्यक्षा वनिता वागस्कर, शहर संघटक प्रल्हाद गवळी, निलेश हांडे, शहर सचिव रवी सहाणे आदी उपस्थित होते.

राज ठाकरे म्हणाले, "कसबा आणि कोथरुड माझ्यासाठी महत्वाचे आहे. कसबा गणपतीचे दर्शन घेऊन मनसेची स्थापना केली होती. त्यामुळे या मतदारसंघाशी माझे घट्ट नाते आहे. कसब्याला ऐतिहासिक वारसा आहे. माँ जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी याच भूमीत सोन्याचा नांगर फिरवून हे शहर वसवले होते. आज अस्ताव्यस्त वाढलेले हे शहर समस्यांनी ग्रस्त आहे. मात्र, आपण आपला इतिहास, स्वाभिमान विसरलो आहोत. केवळ जय भवानी, जय शिवाजी अशा घोषणा देऊन चालणार नाही, तर इतिहास समजून घेऊन तो जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे."

"शहर कसेही वाढत चालले आहे. त्याला कोणतेही नियोजन नाही. केवळ मेट्रो आणि उड्डाणपूल झाले म्हणजे शहराचा विकास होत नाही. येथील आमदार, खासदार निवडून येतात. त्यांच्याकडे कोणतेही व्हिजन नाही. नियोजन नाही. परिणामी शहराचा बोजवारा उडाला आहे. आपण शिक्षित-अशिक्षित आहोत का यापेक्षा आपण सुज्ञ आहोत का, याचा विचार होणे ही आजच्या काळाची गरज आहे. कडवट हिंदुत्व, मराठीपण आपण कधीही सोडता कामा नये. इतर राज्यांप्रमाणे आपली प्रादेशिक अस्मिता जपली पाहिजे," असेही राज ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले.

"राज्यात सुरु असलेला राजकीय खेळ वीट आणणारा आहे. 2019 मध्ये ज्यांच्याबरोबर मते मागितली; स्पष्ट बहुमत घेतले. त्यांना सोडून पहाटेचा शपथविधी झाला. काकांनी डोळे वटारले की ते सरकार पडले. मग आश्चर्य वाटावे, अशी काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेची आघाडी झाली आणि सरकार आले. ज्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेचे काँग्रेस व्हायला लागले, तर दुकान बंद करीन, असे सांगितले होते. त्यांच्या बाजूला यांनी यांचे दुकान थाटले, हे संतापजनक आहे. पुढे या तिघाडी सरकारमधून एकनाथ शिंदे ज्यांच्यामुळे बाहेर पडले, त्याच अजित पवारांना मांडीवर घेऊन बसले. असले गलिच्छ राजकारण चालू आहे, कारण आपल्याला चीड येत नाही," अशी टीका सर्वच पक्षांवर राज ठाकरे यांनी केली. मुख्यमंत्री असताना इंटेलिजन्सचा रिपोर्ट मिळत असतो, हेदेखील त्यांना समजले नाही. म्हनुनच ढांगेखालून 40 आमदार गेले तरी यांना तपास लागला नाही. मग पक्ष गेला, चिन्ह गेले आणि हे घरातच बसले, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांना राज यांनी टोला लगावला.

या बदलेल्या, दिशा भरकटलेल्या राजकारणाला सरळ करायचे असेल, महाराष्ट्र कायम दिशादर्शक राहावा, असे वाटत असेल, तर राज्यभरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन राज ठाकरे यांनी केले. गणेश भोकरे याच्यासारखा एक तरुण, उमदा, धडपडा व अडीअडचणीत तुमच्यासोबत उभा राहणारा कार्यकर्ता तुम्हाला देतोय, त्याला निवडून आणण्याची जबाबदारी तुम्हा कसबावासीयांची आहे, असेही राज ठाकरे यांनी सांगितले.

तत्पूर्वी, गणेश भोकरे यांनी आपल्या भाषणात कसबा मतदारसंघात भाजपचा 15 वर्षे, तर काँग्रेसचा गेल्या दोन वर्षांपासून आमदार आहे. मात्र, कसब्यातील समस्या जैसे थे आहेत. जुन्या वाड्यांचा, वाहतूक कोंडीचा प्रश्न येथे मोठा आहे. त्यामुळे येथील स्थानिक लोक उपनगरांत स्थलांतरित होत आहेत. वाड्यांचा पुनर्विकास योग्य पद्धतीने झाला, तर कसब्याचे रूप पालटणार आहे. त्यामुळे आमदार झाल्यावर वाड्यांच्या पुनर्विकासाच्या नियमांत बदल करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे, असे भोकरे म्हणाले.

रणजित शिरोळे, ॲड. गणेश सातपुते, निलेश हांडे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

## ठळक बातम्या

### 'बोपदेव घाट' प्रकरणातील आरोपींना न्यायालयीन कोठडी

**पुणे : (आरंभ पर्व) :** बोपदेव घाटात तरुणीवर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी दोन अटक आरोपींच्या पोलिस कोठडीतील चौकशीचा अधिकार राखून ठेवत न्यायालयाने त्यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. एच. अटकरे यांनी हा आदेश दिला. आरोपींचा तिसरा साथीदार बाप्या गोसावी ऊर्फ सोमनाथ यादव ऊर्फ सूरज दशरथ गोसावी अद्याप सापडलेला नसून, त्याला अटक केल्यावर तिघा आरोपींच्या एकत्रित चौकशीसाठी अटक आरोपींच्या पोलिस कोठडीतील चौकशीचा अधिकार राखून ठेवण्यात आला. याप्रकरणी आरोपी शोएब ऊर्फ अख्तर बाबू शेख (वय 27, रा. आदर्शनगर, मंतरवाडी, उरुळी देवाची) आणि चंद्रकुमार रविप्रसाद कनोजिया (वय 20, रा. होलेवस्ती, उंड्री) यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली.

### महिलेचे दागिने बसस्थानकात चोरीस

**पुणे : (आरंभ पर्व) :** स्वारगेट बसस्थानकात ज्येष्ठ महिलेकडील रोकड आणि सोन्याचे दागिने असा 71 हजार 500 रुपयांचा ऐवज चोरुन नेण्यात आला. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. तक्रारदार ज्येष्ठ महिला बारामतीत राहायला आहेत. त्या स्वारगेट स्थानकातून बारामतीकडे निघाल्या होत्या. बसमध्ये प्रवेश करताना चोरट्यांनी महिलेच्या पिशवीतून अडीच हजारांची रोकड आणि 69 हजार रुपयांचे दागिने, असा ऐवज चोरुन नेला. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक अशोक पाटील तपास करत आहेत.

# इंदापूरची दुरंगी होणारी निवडणूक झाली तिरंगी

## भरणे, हर्षवर्धन पाटील आणि मानेंमध्ये चुरस

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंदापूर मतदारसंघामध्ये शरद पवार गटाकडून हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देण्यात आल्याने पेचप्रसंग निर्माण झाला आहे. पक्षाशी एकनिष्ठ असलेले दुखावले गेले. त्यातून प्रवीण माने यांनी अपक्ष म्हणून निवडणूक आखाड्यात उडी घेतली आहे. तर तिकडे अजित पवार गटाकडून आमदार दत्तात्रय भरणे हे नशीब अजमावत आहेत. त्यामुळे दुरंगी होणारी ही निवडणूक आता तिरंगी झाली आहे.



या मतदारसंघात अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट अशी सरळ लढत होणार असे चित्र होते. मात्र, ऐनवेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भाजपमधून थेट शरद पवार गटात प्रवेश केला. तसेच त्यांना उमेदवारीही दिली. त्यामुळे पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्यांनी आपली भूमिका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासमोर मांडली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर पक्षाशी फारकत घेत तिसरी आघाडी निर्माण झाली.

### निवडणुकीतील कळीचे मुद्दे

आजी-माजी आमदार नको अशी नागरिकांची भूमिका असल्याने त्यांना नवा बाजी हवा आहे आणि त्यावरच सध्या मतदारसंघात चर्चा सुरू आहेत.
तालुक्यातून ३० ते ३१ हेक्टर ऊस उत्पादन केला जातो, मात्र तीन सहकारी एक खासगी कारखाना असून देखील वेळेत ऊस घेऊन जात नाही. दर मिळत नाही त्यामुळे तालुक्यात चांगला दर देणार आणि त्यापेक्षा वेळेत ऊस नेणाऱ्याकारखान्याची गरज आहे.
सर्व सोयी सुविधा असणारे रुग्णालयात हवे आहे. एमआयडीसी आहे पण उद्योगनाही त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाणवाढत आहे.

त्यामुळे आता हर्षवर्धन पाटील, दत्तात्रय भरणे आणि प्रवीण माने यांच्यात चुरशीची तिरंगी लढत होत आहे. यामध्ये मतदार कोणाच्या बाजुने उभे राहतात आणि कोणाचा विजय होतो हे येणारा काळच ठरवेल.

# पुण्यामधील २१ पैकी १० मतदारसंघांतील बंडखोर कोणासाठी जुळवणार विजयाचे गणित?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यात 21 मतदारसंघांतील लढतीचे चित्र स्पष्ट झाले असून 10 मतदारसंघांत बंडखोर निर्णायक ठरणार आहेत. शरद पवार विरुद्ध अजित पवार गट अशी थेट लढत 8 मतदारसंघांत होणार असून पाच मतदारसंघांत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार भाजपशी भिडणार आहेत. तर काँग्रेस विरुद्ध भाजप अशी लढत तीन ठिकाणी होणार आहे. बंडखोरीचा मोठा फटका शहरासह ग्रामीणमधील महत्त्वाच्या मतदारसंघांना बसणार आहे. त्यामुळे 21 पैकी10 मतदारसंघांत बंडखोर महायुती- महाआघाडीच्या विजयाचे गणित जुळवणार आहेत.

पुणे जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला. 2019 मध्ये जिल्ह्यात 21 पैकी 10 आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडून आले होते. आता पक्षातील फुटीनंतर अजित पवारांकडे 9 तर शरद पवार यांच्याकडे केवळ एक आमदार राहिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसनंतर भाजप हा जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष 2019 ला ठरला होता. जिल्ह्यात भाजपचे 8 आमदार निवडून आले होते. काँग्रेसचे सध्या तीन आमदार आहेत. आताची सर्वच राजकीय समीकरणे राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन्ही पक्षांच्या फुटीनंतर बदलली आहेत. 2019 ला विरोधात लढलेल्या भाजपाला आता सोबत घेऊन अजित पवार मैदानात उतरले आहेत. जिल्ह्यात 11 जागी अजित पवार गटाचे उमेदवार उभे आहेत, तर 13 जागी शरद पवार गटाचे उमेदवार उभे आहेत.



महायुती-महाआघाडीतील अनेक इच्छुकांनी उमेदवारी न मिळाल्यामुळे बंडखोरी केली आहे. जिल्ह्यात बंडखोरी झालेल्या मतदारसंघांमध्ये पुणे शहरातील कसबा, पर्वती, शिवाजीनगर, कोथरुड, हडपसर, तर ग्रामीणमधील भोर, आंबेगाव, जुन्नर, इंदापूर, पुरंदर या मतदारसंघांचा समावेश आहे. कसब्यात काँग्रेसच्या कमल व्यवहारे, पर्वतीत काँग्रेसचे आबा बागुल, शिवाजीनगरमध्ये काँग्रेसचे मनीष आनंद, कोथरुडमध्ये अजित पवार गटाचे विजय डाकले, हडपसरमध्ये उद्धवसेनेचे गंगाधर बधे, भोरमध्ये भाजपचे किरण दगडे-पाटील आणि शिंदेसेनेचे कुलदीप कोंडे, आंबेगावमध्ये उद्धवसेनेच्या सुरेखा निघोट, जुन्नरमध्ये शिंदेसेनेचे शरद सोनावणे आणि भाजपच्या आशाताई बुचके, इंदापूरमध्ये शरद पवार गटाचे प्रवीण माने, तर पुरंदरमध्ये शरद पवार गटाचे संभाजी झेंडे यांनी बंडखोरी केली आहे.

### महाआघाडीला बंडखोरी रोखण्यात अपयश

पोटनिवडणुकीमुळे चर्चेत आलेल्या कसबा मतदारसंघात काँग्रेसच्या कमल व्यवहारे यांनी बंडखोरी केल्यामुळे महाआघाडीसमोरच्या अडचणी वाढल्या आहेत. काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर आणि भाजपचे हेमंत रासने यांच्यात मुख्य लढत आहे. शिवाजीनगरमध्ये काँग्रेसच्याच मनीष आनंद यांनी बंडखोरी केली आहे. भाजपचे आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि काँग्रेसचे दत्ता बहिरट यांच्यात मुख्य लढत आहे. पर्वती मतदारसंघात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याने बंडखोरी केली असून भाजपच्या आमदार माधुरी मिसाळ यांच्या विरोधात शरद पवार गटाच्या अश्विनी कदम मैदानात आहेत. तर हडपसरमध्ये उद्धवसेनेच्या गंगाधर बधे यांनी बंडखोरी केली आहे. हडपसरमध्ये अजित पवार गटाचे चेतन तुपे आणि शरद पवार गटाचे प्रशांत जगताप यांच्यात लढत आहे. मनसेने इथे साईनाथ बाबर यांना उमेदवारी दिली आहे. कोथरूडमध्ये सुरुवातीला बंडाचा झेंडा हाती घेतलेले माजी नगरसेवक अमोल बालवडकर आता चंद्रकांत पाटील यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. त्यामुळे पक्षांतर्गत कलहाचा मुद्दा मागे पडला असून आता उद्धवसेना आणि मनसेचे तगडे आव्हान पाटील यांच्यासमोर असणार आहे. पाटील यांच्या विरोधात उद्धवसेनेचे चंद्रकांत मोकाटे आणि मनसेचे किशोर शिंदे रिंगणात आहेत.






# शेतकऱ्यांच्या हिताची 'महायुती'



महायुती सरकार करत आहे 'बळीराजाला बळकट'

बळीराज्यावरून राजकारण करून शेतकऱ्यांमध्ये सरकारविषयी असंतोष निर्माण करणे ही महाविकास आघाडीची खूप जुनी सवय आहे. महायुतीने कधीच शेतकऱ्यांसाठी काही नाही केले, असे बोलून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न शरद पवार करत आले आहेत. यामध्येच आता राज्य सरकार सरासरी 50 ते 60 साठ हजार रुपये अल्पभूधारक शेतकऱ्यांना वर्षाला देत आहे. असा दावा अर्थमंत्री अजित पवार यांनी करून महाविकास आघाडीच्या घाणेरड्या राजकारणाला expose केले आहे.काय आहे हा दावा? आणि कसे राज्य सरकार सरासरी 50 ते 60 साठ हजार रुपये अल्पभुधारक शेतकऱ्यांना वर्षाला देत आहे हे बघुयात.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचे पश्चिम महाराष्ट्रात दणदणीत यश

ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणारी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' राज्यात फेब्रुवारीपासून लागू करण्यात आली आहे आणि आठ महिन्यातच या योजनेला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. महाराष्ट्रात सौर ऊर्जा वापरणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पंतप्रधान सौर ऊर्जा योजनेला मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे राज्यातील सुमारे 31,000 घरांमध्ये सौरऊर्जेचे वीजग्राहक तयार झाले आहेत. यापैकी 4714 घरांमध्ये सौर दिवे प्रत्यक्षात चालू झाले आहेत. या योजनेअंतर्गत प्रत्येक घराच्या छतावर 1 ते 3 किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रणाली बसवण्यात आल्या आहेत.



भारतीय शेतीला उर्जितावस्था देण्यासाठी: सात प्रमुख योजनांची अंमलबजावणीसाठी मंत्रिमंडळाने 14,235 कोटी रुपये मंजूर केले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने संपूर्ण देशभरातील शेतकऱ्यांचे जीवन आणि जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने सात प्रमुख योजनांच्या सर्वसमावेशक पॅकेजला मंजुरी दिली आहे. एकूण रु. 14,235 कोटी 30 लाख रुपये खर्चासह, हे उपक्रम शेतीचे आधुनिकीकरण, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि दीर्घकालीन अन्न आणि पोषण सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने आखण्यात आले आहेत. हे प्रयत्न शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या आणि कृषी क्षेत्रातील हवामान बदल, मातीचा ऱ्हास आणि बाजारपेठेतील सुलभता यासारख्या गंभीर आव्हानांना तोंड देण्याच्या सरकारच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहेत.

कृषी शिक्षण, व्यवस्थापन आणि सामाजिक विज्ञानांचे बळकटीकरण: केंद्रीय मंत्रिमंडळाचा रु 2291 कोटींचा सर्वसमावेशक उपक्रम

भारत सरकारने अलीकडेच 2,291 कोटी रुपयांच्या भरीव खर्चासह कृषीशिक्षण, व्यवस्थापन आणि सामाजिक विज्ञान बळकट करण्यासाठी महत्त्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या गुंतवणुकीचे उद्दिष्ट कृषी संस्थांचे आधुनिकीकरण करणे, संशोधन क्षमता वाढवणे आणि कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपायांना चालना देणे आहे. शिक्षण आणि व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करून, कृषी क्षेत्रातील विकसित आव्हानांना तोंड देण्यासाठी, अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी सक्षम , कुशल कामगार निर्माण करण्याचा सरकारचा मानस आहे.

भारतीय कृषी क्षेत्राचा कायापालट करण्यासाठी 2817 कोटी रुपयांचे डिजीटल कृषी अभियान

गेल्या काही वर्षांपासून, भारताच्या डिजिटल क्रांतीने नव्या युगात पाऊल टाकले आहे. कृषी क्षेत्राच्या अशाच परिवर्तनासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने 2 सप्टेंबर रोजी कृषी क्षेत्रात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (DPI) तयार करण्यासाठी 2,817 कोटी रुपयांच्या डिजिटल कृषी अभियानाला मंजुरी दिली आहे. हे आभियान काय आहे आणि त्याचा शेतकरी आणि शेती क्षेत्रावर काय परिणाम होईल?

भाजपाचे शेती सिंचन मॉडेल

भारतात सिंचन शेती हा महत्त्वाचा घटक आहे आणि त्याचे कार्यक्षम व्यवस्थापन हे कायम एक आव्हान राहिले आहे. मध्यप्रदेशने आपल्या सिंचन क्षेत्रात नावीन्यपूर्ण सुधारणा केल्या आहेत, ज्यामुळे सिंचित क्षेत्रे आणि शेतीची उत्पादकता वाढली आहे.

# सचिन दोडके यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



## महिलांसह युवकांची मोठी गर्दी

### प्रचाराची नाही तर विजयाची रॅली : सचिन दोडके

धनकवडी व बालाजी नगर परिसरातील या रॅलीत बोलताना ही प्रचाराची नव्हे तर विजयाची रॅली आहे. आगामी जनतेच्या समर्थनाचे चित्र असेच दिसणार आहे. कारण खडकवासला मतदारसंघातील जनतेला परिवर्तन करायचे आहे. लोकांचे खूप प्रेम आपल्याला मिळत आहे आणि मिळणार आहे. आपला विजय निश्चित झाला आहे. आगामी काळातही प्रचाराचा धडाका असाच सुरू राहणार आहे. आणखी चित्र स्पष्ट होईल..जनतेने असाच विश्वास मत पेटीतून दाखवून द्यावा ही विनंती करतो. - सचिन दोडके, उमेदवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदार संघातील बालाजीनगर परिसरात महाविकास आघाडीच्या वतीने उमेदवार सचिन दोडके यांच्या प्रचारार्थ पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेस नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या तिरंगी लढतीमध्ये अस्तित्वाची लढाई सुरू आहे. अशा परिस्थितीमध्ये सचिन दोडके यांनी खडकवासला मतदार संघाच्या विविध भागांमध्ये प्रचार सुरू केला आहे.

बालाजी नगर परिसरातील विविध भागांमध्ये यांनी पदयात्रा घेऊन मतदारांशी संवाद साधला.

यावेळी हजारो नागरिकांच्या गर्दीमध्ये राम कृष्ण हरी वाजवा तुतारीचा नारा घुमला. यामुळे बालाजी नगर परिसरामध्येही सचिन दोडके यांना चांगला प्रतिसाद असल्याचे दिसत आहे.

या पदयात्रेमध्ये उमेदवार सचिन दोडके यांच्यासह बाळाभाऊ धनकवडे, विशाल तांबे,शिवसेनेचे नितीन वाघ यांच्यासोबत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार ,शिवसेना ठाकरे, कॉंग्रेस, आप या सर्व पक्षाचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालाजी नगर परिसरात झालेल्या या पदयात्रेची संपूर्ण मतदारसंघात चर्चा सुरू आहे.

धनकवडी परिसरातील देव देवतांचे दर्शन घेऊन रॅलीचा प्रारंभ करण्यात आला. लहान बालकांसह, महिला, युवकांनी मोठ्या संख्येने स्वयं स्फूर्तीने सहभाग नोंदवत दोडके यांच्यावर विश्वास व्यक्त केला.





# सचिनच्या रूपाने कार्यतत्पर आमदार निवडून द्या

**महाराष्ट्राच्या परिवर्तनाची सुरुवात खडकवासल्यातून करण्याचे सुळे यांचे मतदाराना आवाहन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघातील प्रश्न समस्या निवारणाठी काम करणारा आमदार हवा. त्यासाठी सचिन दोडके यांना आमदार करण्यासाठी सर्वांनी जोरदार प्रचार करावा असे आवाहन खा. सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सचिन शिवाजी दोडके यांच्या प्रचारार्थ मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक धायरी येथे घेण्यात आली.

खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. त्यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात मध्ये परिवर्तन अटळ आहे व त्याची सुरुवात खडकवासल्यातून करा .

महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार हे आपल्या समोरील प्रमुख मुद्दे आहेत. परिवर्तन का गरजेचे आहे, हे प्रत्येक मतदाराला समजावून सांगा तसेच महाविकास आघाडीचा पंचसूत्री कार्यक्रम प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचा. असेही आवाहन सुळे यांनी व्यक्त केले..

यावेळी पदाधिकारी व नेत्यांनी खडकवासला विजयासाठी परिश्रम घेऊन खडकवासल्यात परिवर्तन करण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी माजी आमदार कुमार गोसावी, खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, कॉंग्रेसचे श्रीरंग चव्हाण, शिवसेनेचे भारत कुंभारकर, यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विजय शिवतारेंवर कारवाई करा

*रोहन सुरवसे-पाटील*




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना महायुतीचे उमेदवार, माजी मंत्री विजय शिवतारे यांनी निवडणूक प्रचारासाठी 'एअर बलून' लावून आचारसंहितेचा भंग केला आहे. याप्रकरणी शिवतारे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी केली.

जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे, तसेच निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना कारवाईच्या मागणीचे निवेदन सुरवसे-पाटील यांनी दिली. याप्रसंगी युवक काँग्रेसचे पदाधिकारी अक्षय सागर, सागर घाडगे, ज्ञानेश्वर जाधव हे उपस्थित होते.

फुरसुंगी येथील 'रॉयल स्टे ईन लॉजिंग' या लॉजवर शिवतारे यांनी निवडणूक प्रचारासाठी हवेत 'एअर बलून' बांधला आहे. ज्यावर शिवसेना पक्ष चिन्ह धनुष्यबाण तसेच विजय शिवतारे यांच्या संदर्भातील प्रचाराचा मजकूर आहे. आचारसंहितेच्या काळात निवडणूक प्रचाराच्या उद्देशाने बॅनर अथवा होर्डिंग लावण्यास राजकीय पक्षांना व उमेदवारांना प्रतिबंध आहे. विजय शिवतारे यांनी लावलेल्या एअर बलूनचे व्हिडीओ तसेच फोटोही सुरवसे पाटील यांनी प्रसारित केले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे सांगितल्याचेही सुरवसे-पाटील यांनी सांगितले.

# निस्सीम प्रेम आणि सूडाची गाथा अनुभवण्यास सज्ज रहा



**मुंबई (दे. आरंभ पर्व)**

विश्वासघात आणि सूड यांच्यात गुंफलेली अतूट प्रेम व उत्कट इच्छेची एपिक गाथा डिस्नी+ हॉटस्टारच्या ठुकरा के मेरा प्यारमध्ये रोमांसला नव्या उंचीवर घेऊन जाण्यास सज्ज आहे. ही सिरीज जटिल पात्र व हृदयस्पर्श कथानकाला सादर करते, जेथे नियती अखेर कुलदीप (धवल ठाकूर) आणि शन्विका (संचिता बासू) यांचे भविष्य ठरवते. उत्तर प्रदेशच्या पार्श्वभूमीवर स्थित या सिरीजचे कथानक प्रेमात आकंठ बुडालेल्या दोन किशोरवयीनांच्या जीवनाला दाखवते, जेथे ते जात व पंथाच्या आव्हानांचा सामना करतात.

बॉम्बे शो स्टुडिओज एलएलपी निर्मित आणि श्रद्धा पासी जयरथ दिग्दर्शित सिरीज ठुकरा के मेरा प्यारमध्ये उदयोन्मुख नवोदित कलाकार धवल ठाकूर व संचिता बासू यांच्यासह गोविंद पांडे प्रमुख भूमिकेत आहेत.

या सिरीजच्या दिग्दर्शक श्रद्धा पासी जयरथ म्हणाल्या, ठुकरा के मेरा प्यार प्रेमकथा असण्यासोबत विश्वासघात, पूर्वाग्रह आणि मानवी भावनेच्या गुंतागूंतींना देखील सादर करते. कॉलेजमधील क्लासिक रोमांसमध्ये आधुनिक पैलूची भर करण्याचा आमचा मनसुबा होता. धवल व संचिता यांसारख्या प्रतिभावान कलाकारांसह आम्ही आशा करतो की प्रेक्षक हा क्लासिक रोमांस पाहण्याचा आनंद घेतील. मी ही संधी देण्यासाठी डिस्नी+ हॉटस्टारचे आभार व्यक्त करते आणि प्रेक्षकांची या सिरीजप्रती प्रतिक्रिया जाणून घेण्यास उत्सुक आहे.

या सिरीजमध्ये कुलदीपची भूमिका साकारणारे धवल ठाकूर म्हणाले, कुलदीपच्या गुंतागूंतींना व्यापून घेताना मला त्याचे पैलू समजले, ज्यामुळे या भूमिकेमध्ये सामावून जाण्यास मदत झाली. मी कथानक, दिग्दर्शन व प्रक्रियेवर विश्वास ठेवला, ज्यामुळे मला पात्राच्या प्रवासामध्ये सामावून जाता आले. अभिनेता म्हणून हा अनुभव समाधानकारक ठरला.

सिरीज ठुकरा के मेरा प्यारचे उत्तम लेखन, तसेच वर्कशॉप्सदरम्यान टीमचे सहयोगात्मक प्रयत्न आणि एकूण इनसाइट्समुळे मला कुलदीपची भूमिका उत्तमरित्या सादर करण्यास मदत झाली. डिस्नी+ हॉटस्टारवरील आमच्या या उत्कट निर्मितीबाबत प्रेक्षकांचे मत जाणून घेण्यास मी अत्यंत उत्सुक आहे.

या सिरीजमध्ये शन्विकाची भूमिका साकारलेल्या अभिनेत्री व इन्फ्लूएन्सर संचिता बासू म्हणाल्या, शन्विकाची भूमिका साकारण्याचा अनुभव समाधानकारक राहिला आहे.

तिचा उत्साही व बेधडक स्वभावामधून तिची भूमिका सार्थ ठरते. मी सिरीज ठुकरा के मेरा प्यारकडे प्रेमाप्रती माझ्या जाणीवेला आकार दिलेल्या चित्रपटांप्रती मानवंदना म्हणून पाहते. नवीन व ओळखीच्या चेहऱ्यांमुळे माझ्यामधील भिती दूर झाली आणि सह-कलाकार धवलच्या पाठिंब्यामुळे मला उत्तम साहचर्य निर्माण करण्यास मदत झाली.

मी स्वत:ला पडद्यावर पाहण्यास आणि डिस्नी+ हॉटस्टारवरील माझ्या परफॉर्मन्सबाबत प्रेक्षकांचे मत जाणून घेण्यास अत्यंत उत्सुक आहे.

पुन्हा एकदा जुन्या काळातील प्रेम आणि हृदयभंगाच्या आठवणींना उजाळा देण्यास सज्ज राहा आणि पहा सिरीज ठुकरा के मेरा प्यार 22 नोव्हेंबर 2024 पासून फक्त डिस्नी+ हॉटस्टारवर.

# थोडक्यात




## सूर्यदेव हे आपल्या समोरील आव्हानांवर उपाय आहेत

**पुणे (आरंभ पर्व) :** भारतीय लोकगायिका कल्पना पटवारी, तिच्या सामाजिक भान असलेल्या संगीतासाठी ओळखल्या जातात, सामाजिक संदेशांसह कलात्मक स्वातंत्र्यावर भर देतात. दरवेळेप्रमाणेच यावेळीही त्याने काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताचे सुप्रसिद्ध पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी अयोध्येत बांधलेल्या मंदिराच्या पायाभरणी समारंभात दिलेल्या भाषणात 'सौरऊर्जा'चा वारंवार उल्लेख, ज्यांना सूर्यवंशी म्हणतात, ज्यांच्या नावाने श्री रामचंद्रांचे जन्मस्थान आहे. चंद्र आणि सूर्य प्रत्यक्षात उपस्थित आहेत, हे चिन्ह आपल्यासाठी एक उदाहरण आहे. हे लक्षात घेऊन कल्पना पटवारी, ज्यांची भारतातील सक्रिय नागरिकांमध्ये गणना केली जाते, त्यांनी श्री मोदीजींच्या शब्दांना संगीताशी जोडून जनजागृती करण्यासाठी एक म्युझिक व्हिडिओ तयार केला आहे. जे विज्ञानाला छठशी जोडते, ज्याचे शीर्षक 'सौर ऊर्जा' आहे. व्हिडिओमध्ये एक जिज्ञासू मुलगा, अभ्यास करताना आणि खेळताना वारंवार वीज खंडित झाल्यामुळे आईला उपाय विचारतो, तेव्हा आई छठ गाण्यातून सांगते, सौरऊर्जा ही स्वच्छ अक्षय ऊर्जा आहे, सूर्यदेव हा लोकांच्या जीवनाचा आधार आहे. प्रिये, तिला पुन्हा पुन्हा नमस्कार, छठी मैया ही सूर्याची शक्ती आहे, ज्याचा महिमा अपार आहे. आईच्या बोलण्यावर समाधानी होऊन मुलगा म्हणतो, 'सौर ऊर्जा' ही सर्वश्रेष्ठ आहे, या जगाचा आनंद सूर्यापासून सर्व हिरवळ आहे, म्हणूनच पृथ्वी अद्वितीय आहे, चला सूर्याला प्रार्थना करून हिरवाईकडे वाटचाल करूया.

## सोनालिकाने विक्रमासह सणाचा हंगाम साजरा केला

- **ऑक्टोबर २४ मध्ये केली २०,०५६ ट्रॅक्टरची सर्वाधिक मासिक विक्री**

**पुणे (आरंभ पर्व) :** भारतातील नंबर 1 ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने नुकत्याच संपलेल्या सर्वात मोठ्या सणासुदीच्या हंगामात शेतकऱ्यांसाठी जास्तीत जास्त आनंदाची निश्चित केली आहे. कंपनीने ऑक्टोबर महिन्यात 20,056 ट्रॅक्टरच्या मासिक एकंदर विक्रीच्या विक्रमाचे नवीन शिखर गाठले आहे. सोनालिका ट्रॅक्टर्सच्या इतिहासातील ही सर्वात मोठी मासिक कामगिरी कस्टमाईज्ड ट्रॅक्टरचा मालक होणे आणि शाश्वत शेतीच्या समृद्धीचा स्वीकार करणे, हे शेतकऱ्यांसाठी सोपे करण्याच्या त्यांच्या ध्येयाशी सुसंगत आहे. सोनालिका ट्रॅक्टर्स विश्वासार्ह ब्रँड म्हणून कायम असून तो शेतकऱ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणत आहे तसेच सर्वात शक्तिशाली हेवी-ड्युटी ट्रॅक्टर्ससह कृषी क्षेत्राला उन्नत करत आहे. कंपनीच्या वार्षिक 'हेवी ड्युटी धमाका' ऑफरमुळे शेतकऱ्यांना सर्वात मोठ्या सणासुदीच्या काळात वाजवी किमतीत प्रगत तंत्रज्ञानावर चालणारे ट्रॅक्टर मिळण्याची हमी मिळाली आहे. तसेच, शेतकऱ्यांना जीवनात पुढे जाण्यासाठी आधाराची महत्त्वपूर्ण यंत्रणा लाभली आहे. देशातील विस्तीर्ण डीलरशिप नेटवर्कमुळे कंपनीने शेतकऱ्यांच्या प्रादेशिक गरजेनुसार कस्टमाईज्ड योग्य उत्पादन मिळण्याची निश्चिती झाली आहे. तसेच, असामान्य कामगिरी देण्यासाठी प्रत्येक ट्रॅक्टरसह गुणवत्तेप्रति आपली वचनबद्धता पूर्ण केली. या अभूतपूर्व यशाबद्दल आपले विचार मांडताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "असामान्य अशा 20,056 ट्रॅक्टर विक्रीसह मागील सर्व मासिक विक्रमांना मागे टाकल्याबद्दल आम्ही आनंदी आहोत. आमच्या शेतकरी समुदायासोबत सामाईक केलेला हा एक अभिमानास्पद क्षण आहे. प्रत्येक शेतकऱ्याला विश्वासार्ह, सानुकूलित आणि त्यांच्या गरजेनुसार अद्वितीय असा शाश्वत समृद्धीकडे त्यांच्या प्रवासाला आधार देणारा योग्य ट्रॅक्टर उपलब्ध व्हावा, ही आमची सर्वात मोठी प्रेरणा आहे.

## थोडक्यात



### अयोध्येत 121 फूट उदबत्ती प्रज्वलित करून रचला इतिहास

**पुणे (आरंभ पर्व) :** भारतातील अग्रगण्य गृहपूजा ब्रँड असलेल्या सायकल प्युअर अगरबत्तीने रघुकुल फाउंडेशनच्या सहकार्याने अयोध्येतील भरतकुंड महोत्सवात लक्षणीय अशी 121 फुटाची उदबत्ती प्रज्वलित करून भव्यता, दिव्य आणि मोहक सुगंधाचा स्पर्श घडविला. सात दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय दंडाधिकारी श्री. अशोक कुमार सैनी आणि अयोध्येचे कमांडो अधिकारी श्री. आशुतोष तिवारी यांच्या हस्ते अशा प्रकारची सर्वात मोठी उदबत्ती प्रज्वलित करून करण्यात आले. या वर्षाच्या सुरुवातीला अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी सायकल प्युअरने म्हैसूरमध्ये मंदिराची प्राणप्रतिष्ठा साजरी करण्यासाठी 111 फुटाची उदबत्ती तयार केली होती. प्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांच्या मातोश्री श्रीमती सरस्वती यांनी ती प्रज्वलित केली होती. हा प्रज्वलनाचा सोहळा सांस्कृतिक अभिमान आणि आध्यात्मिक महत्त्वाला मूर्त रूप देणारा होता. आनंद, एकता आणि कौटुंबिक सौहार्दाचा संदेश देऊन या महोत्सवाला समृद्ध करणे हा याचा उद्देश होता. या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना अयोध्येचे उपविभागीय दंडाधिकारी श्री. अशोक कुमार सैनी म्हणाले, "भरतकुंड महोत्सव हा आपला सांस्कृतिक वारसा आणि अध्यात्माचे सार यांचे प्रतिबिंब असलेला उत्सव आहे. या विशेष सोहळ्याचा भाग होणे ही सन्मानाची बाब आहे. सायकल शुद्ध अगरबत्ती आणि रघुकुल फाऊंडेशनने तयार केलेली 121 फुटांची उदबत्ती भक्ती आणि एकतेचे सुदृढ प्रतीक आहे. अशा महत्त्वपूर्ण उपक्रमांना पाठिंबा देणे ही गौरवाची बाब आहे आणि भरतकुंड महोत्सवाचा उत्साह वाढवत असताना आपल्या सांस्कृतिक परंपरा जतन करण्यासाठी योगदान देणे ही आनंदाची बाब आहे."




### पुण्यात रोड शो संपन्न

**पुणे (आरंभ पर्व) :** द इंडियन डिजिटल गेमिंग सोसायटी (आयडीजीएस) आणि कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यांच्या सहकार्याने वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अॅन्ड एंटरटेन्मेंट समिट (वेव्हज्) 2025 आणि क्रिएट इन इंडिया चॅलेंजला समर्थन देण्यासाठी पुण्यात रोड शोचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या विशेष सचिव नीरजा सेखर यांनी बीजभाषण केले. याप्रसंगी आयडीजीएसचे संचालक आणि जेटलाईन ग्रुप अॅन्ड जेटसिंथेसिसचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजन नवाणी,एनएफडीसीचे सरव्यवस्थापक अजय ढोके,सीआयआय दिल्लीच्या उप सरसंचालक अमिता सरकार आदी मान्यवर उपस्थित होते. भारतातील मीडिया अॅन्ड एंटरटेन्मेंट (एमअॅन्डई) उद्योगाच्या प्रसारासाठी केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय तर्फे दिल्ली येथे 5 ते 9 फेब्रुवारी 2025 दरम्यान वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अॅन्ड एंटरटेन्मेंट समिट (वेव्हज्) 2025 आणि क्रिएट इन इंडिया चॅलेंज चे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त ॲनिमेशन,व्हिज्युअल इफेक्टस,गेमिंग,कॉमिक्स,इमर्सिव्ह रिॲलिटीज या क्षेत्रातील भागधारकांपर्यंत पोहचण्यासाठी वेव्हज् रोड शो चे आयोजन करण्यात येत आहे. माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या विशेष सचिव नीरजा सेखर म्हणाल्या की, मीडिया अॅन्ड एंटरटेन्मेंट उद्योगात अनेक क्षेत्रे आहेत.त्यांचा एकमेकांशी संवाद होणे गरजेचे आहे.आशय निर्मिती,त्याचा प्रसार आणि वितरण यासाठी व्यासपीठाची गरज आहे.पॉडकास्ट,रील्स,व्हीएफएक्स ,कॉमिक्स यासारख्या प्रकारातील भारतात निर्माण झालेल्या मनोरंजनात्मक आशयाला योग्य व्यासपीठाची गरज आहे.हे लक्षात घेता पुढील वर्षी दिल्ली येथे वेव्हज् या ग्लोबल समिटचे आयोजन करण्यात आले आहे.

# सचिन दोडकेंच्या विजयासाठी "वसंततात्या "अॅक्शन मोडवर !

## वारजेच्या विकासाचे मॉडेल सर्वत्र राबवण्याची गरज : वसंत मोरे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सचिन दोडके यांच्या विजयासाठी शिवसेनेचे डॅशिंगबाज नेते माजी नगरसेवक वसंत तात्या मोरे हे जोरात कामाला लागले आहेत.

सचिन दोडके यांच्या विजयासाठी त्यांनी अॅक्शन घेत प्रभागातील मतदारांशी संवाद साधून मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी कात्रज प्रभागातील महिलांची बैठक घेऊनही त्यांनी विधानसभे बाबतीत महिलांनी एकत्र येऊन सचिन दोडके यांना एक संधी दिल्यास कात्रज च्या विकासामध्ये नक्कीच बदल होईल असे सांगितले..

शिवगंगा खोऱ्यातील मल्लांच्या मेळाव्यात त्यांनी खेळाडू व मल्ल यांना सचिन दोडके यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. आता त्यांना विधानसभेत पाठवून सर्वांनी सहकार्य करा अशी सर्व पैलवान वस्ताद यांना विनंती केली.

नुकतीच त्यांनी त्यांच्या प्रभागातील सोसायटी धारकांची बैठक घेऊन सचिन दोडके सारख्या कार्यतत्पर नेत्याला आमदार म्हणून निवडून द्या असे आवाहन केले.

शिवाय मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांसोबत फराळ चर्चा करताना सचिन दोडके यांच्या साक्षीने या भागातील प्रश्न मांडून नागरिकांना सचिन दोडके यांना आमदार करण्यासाठी सहकार्य करा असे आवाहन केले.

खडकवासला विधानसभेमध्ये आता परिवर्तनाची गरज आहे.

कात्रज भागासाठी मोठे क्रीडांगण, व विविध योजना राबवाव्या असे आवाहन मोरे यांनी सचिन दोडकेंना केले.

खडकवासला विधानसभेसाठी इच्छुक असलेले तात्या मित्रासाठी धावून जात सचिन दोडके यांच्या विजयासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सचिन दोडके यांना फायदा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वसंत मोरे यांच्यासह शिवसेना पक्षाचे खडकवासला मतदारसंघात चांगले प्राभल्य आहे.

### कात्रज भागाच्या विकासासाठी सज्ज : दोडके

फराळ चर्चा सोबत संवाद करताना सचिन दोडके यांनी अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रश्न सोडण्यासाठी कटिबद्ध आहे. आपण सर्वांनी मतदानरूपी आशीर्वाद मला द्यावे कात्रज भागाच्या विकासासाठी मी नक्कीच प्रयत्न करेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

## डिलिव्हरी तरुणांकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
घरी पार्सल देण्यासाठी गेलेल्या डिलिव्हरी तरुणाने घरातील 13 वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याची घटना वाघोलीतील लोहगाव रोड वरील शिवरकर वस्ती मध्ये घडली. या प्रकरणी त्या तरुणावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविनाश धनवटे असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी त्या मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डिलिव्हरी तरुण त्या मुलीच्या घरी दुपारी पार्सल देण्यासाठी गेला. त्यावेळी ती घरात एकटीच होती. त्याने तिच्या आईला फोन केला. तिने पार्सलचे 100 रुपये देण्यास मुलीस सांगितले. 100 रुपये दिल्यानंतर त्या मुलीला त्याने पाणी आणण्यास सांगितले. तिने पाणी आणल्यानंतर त्याने तिच्या अंगावरून हात फिरविला. यानंतर कपडे काढून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. तिने आरडा ओरडा केल्यानंतर त्याने 100 रुपये देऊन तुझ्या आईला काही सांगू नको असे म्हणून पळ काढला. यानंतर मुलीच्या आईने फिर्याद दिली.

## *सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सायबर सिक्युरिटी विषयावर अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात विविध सायबर सुरक्षा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरु झाले आहेत. डायरेक्ट अॅक्शन इंटरनॅशनल यूके आणि कॅनेडियन असोसिएशन फॉर सिक्युरिटी अँड इंटेलिजेंस स्टडीज, व्हॅन्कुव्हर कॅनडाद्वारे मान्यताप्राप्त हे अभ्यासक्रम विद्यार्थी, व्यावसायिक आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सखोल प्रशिक्षण देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.इच्छुक खालील लिंकवर नावनोंदणी करु शकतात - https://campus.unipune.ac.in/ccep/login.aspx यात 2 महिन्यांचा कालावधी असलेला 18 क्रेडिटचा सायबर सिक्युरिटी स्पेशलिस्ट (सीएसएस), 6 महिन्यांचा कालावधी असलेला 20 क्रेडिटचा मास्टरींग इन्फॉर्मेशन सिक्युरिटी (एमआयएस) आणि 6 महिन्यांचा कालावधी असलेला 28 क्रेडिटचा सायबर क्राइम इन्वेस्टिगेटर (सीसीआय ) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या हायब्रीड-फॉर्मेट अभ्यासक्रमांमध्ये आक्षेपार्ह आणि बचावात्मक सुरक्षा, सायबर इंटेलिजन्स आणि इन्व्हेस्टिगेशन, सायबर फॉरेन्सिक्स आणि इन्सिडेंट रिस्पॉन्स, डार्क वेब, क्लाउड सुरक्षा, नेटवर्क सुरक्षा आणि क्रिप्टोग्राफी यासारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात सायबर सिक्युरिटी, कायदा अंमलबजावणी आणि राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रातील 40 हून अधिक राष्ट्रीय तज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी म्हणाले की, " सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तंत्रज्ञान विभागातर्फे सुरु केलेला सायबर सुरक्षा अभ्यासक्रम हा अशा प्रकारचा अनोखा आणि पहिला उपक्रम आहे, जो उद्योग विशेषज्ञ आणि सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात कार्यरत व्यावसायिकांद्वारे शिकविला जाणारा सखोल व्यावहारिक दृष्टीकोन आणि ज्ञान प्रदान करणारा उपक्रम आहे".

# आयुर्वेदाला नवकल्पना, संशोधन व जागतिक भागिदारीची जोड द्यावी

## तेलंगणाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे प्रतिपादन; भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे राज्यस्तरीय धन्वंतरी पुरस्कारांचे वितरण




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
"आयुर्वेद ही प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा आहे. आधुनिक काळात या ज्ञानाला सातत्यपूर्ण संशोधन, नवकल्पना, जागतिक भागीदारी आणि कौशल्यपूर्ण विपणनाची जोड देणे आवश्यक आहे. त्यातून आयुर्वेद आणि निरामय मानवजीवन यांचे ध्येय साध्य होण्यास मदत मिळेल," असे प्रतिपादन तेलंगणा राज्याचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय धन्वंतरी पुरस्कार सोहळा व आयुर्वेद संभाषा या विशेष कार्यक्रमात जिष्णू देव वर्मा बोलत होते. सेनापती बापट रस्त्यावरील सुमंत मुळगावकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात भारतीय आयुर्वेद संस्थेचे अध्यक्ष वैद्य प्रशांत दौंडकर, सचिव वैद्य संकेत खरपुडे आदी उपस्थित होते.

यावेळी वैद्यराज कै. विलास नानल यांचा आयुर्वेद रत्न (मरणोत्तर) सन्मान प्रदान करण्यात आला. आशुतोष नानल यांनी तो स्वीकारला. वैद्यराज सदानंद सरदेशमुख, वैद्यराज समीर जमदग्नी, वैद्य श्रृती जमदग्नी यांना जीवनगौरव पुरस्काराने, तर वैद्य विनय वेलणकर, वैद्य रामदास आव्हाड आणि वैद्य विनायक टेंभुर्णीकर यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जिष्णू देव वर्मा यांनी मोजक्या शब्दांत आयुर्वेदाचे महत्त्व सांगितले. "आयुर्वेद मूळात स्वास्थ्यरक्षण कथन करणारा आहे. मात्र, काही कारणाने स्वास्थ्य बिघडले, तर ते पूर्वपदावर कसे आणायचे, यासाठीचे उपायही आयुर्वेद प्रभावीपणे सांगतो. मानवी शरीरासोबत मन, बुद्धी आणि आत्म्याचा विचार, हा घटक आयुर्वेदाला एकमेकाद्वितीय बनवितो. भारतीय आयुर्वेद संस्था विविध उपक्रमांतून आयुर्वेदाचे हे महत्त्व अधोरेखित करत आहे, हे उल्लेखनीय आहे. आयुर्वेदाचा प्रसार जागतिक पातळीवर होण्यासाठी सातत्यपूर्ण संशोधन, जागतिक भागीदारी आणि नवकल्पनामध्ये समतोल साधण्याची आवश्यकता आहे, तरच आपण निरामयतेकडे वाटचाल करू शकू", असे ते म्हणाले.

पूर्वार्धात धन्वंतरी सन्मानप्राप्त आयुर्वेद तज्ज्ञांच्या जीवनप्रवासातील संघर्ष, साधना आणि यशस्वी कहाणी जाणून घेण्याची संधी मिळाली. या अनुभवकथनांतून श्रोत्यांनी आयुर्वेदाचे सुवर्णक्षण अनुभवले. प्रसिद्ध आयुर्वेद तज्ज्ञांच्या जीवनप्रवासाची ही प्रेरणादायी झलक ऐकताना श्रोते तल्लीन झाले. वैद्य जमदग्नी यांनी आयुर्वेद आणि फार्म्यूला, याविषयी, तर वैद्य सरदेशमुख यांनी कर्करोग संशोधनाविषयी विवेचन केले.

वैद्य वेलणकर यांनी आधुनिक काळातील वैद्यांनी सर्व नव्या यंत्रतंत्रांचा अवश्य स्वीकार करावा, मात्र आपल्या ज्ञानाची नैतिक बैठक अबाधित राखावी, असा सल्ला दिला. वैद्य आव्हाड यांनी आयुर्वेद तज्ञांसमोरील आव्हानांची माहिती दिली.







# भिमराव तापकीर यांच्या गावभेट दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ग्रामीण भागाचा सर्वांगीण नक्कीच करू : आ. भीमराव तापकीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे तीन वेळा आमदार आणि भाजपा-महायुतीचे अधिकृत उमेदवार भिमराव तापकीर यांच्या गाव भेट दौऱ्याला आणि पदयात्रेला मतदारसंघातील ग्रामस्थांचा भरभरून प्रतिसाद लाभला.

शुक्रवार, दि. 8 नोव्हेंबर 2024 रोजी झालेल्या दौऱ्याची सुरुवात जांभळी येथे पांडुरंगाच्या दर्शनाने करण्यात आली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांच्या प्रश्नांसाठी झटण्याची ग्वाही दिली.

सकाळी 9.00 वा जांभळी येथे पांडुरंग दर्शन केल्यानंतर बहुली येथे श्री कालभैरवनाथ मंदिरात दर्शन व ग्रामस्थांशी संवाद साधला. पुढे भगतवाडी येथे विठ्ठलसेवा मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी होत विठू नामाचा जागर करण्यात आला. पोटेवाडी येथे ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले व गावाच्या विकासाची चर्चा करण्यात आली.

याशिवाय आ. भीमराव तापकीर यांनी सांगरुण,मांडवी खुर्द, मांडवी बुद्रुक, अगळंबे, खडकवाडी येथे ग्रामस्थांशी चर्चा केली.

ह्या गावभेट प्रसंगी मा. उपमहापौर दिलीप बराटे, कृषी उत्पादन बाजार समिती संचालक दत्ताभाऊ पायगुडे, उद्योजक गजानन पायगुडे, राजाभाऊ जोरी, संतोष चोरघे, पुणे ग्रामीण उपाध्यक्ष सचिन पायगुडे, तसेच भाजपा ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे, महिला अध्यक्ष दिपाली ताई वाव्हळ आणि महायुतीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

खडकवासला मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकास आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी झटणारे नेतृत्व म्हणून तापकीर यांचे कार्य आदर्शवत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

### मतदारसंघातील प्रकल्पांसाठी कटिबद्ध

गाव भेटी दरम्यान आमदार भिमराव तापकीर यांनी त्यांच्या कार्यकाळातील विकास कामांचा आढावा घेतला . विविध विकास कामासाठी दिलेल्या निधीची ही त्यांनी यावेळी माहिती दिली आगामी काळातही शाश्वत विकास आणि गावांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे ठासून सांगितले.

# थोडक्यात



## धोंडो केशव कर्वे यांना कर्वे समाजकार्य महाविद्यालयाची श्रद्धांजली

**पुणे (आरंभ पर्व) :** पुण्यातील कर्वे समाजकार्य संस्था आणि महाविद्यालयाने आज भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण केली. समाज सुधारक आणि प्रेरणास्त्रोत असलेल्या कर्वे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 9 नोव्हेंबर 1963 रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली. कर्वे यांच्या विचारांचा वारसा जपत, संस्था आजही सामाजिक कार्याच्या क्षेत्रात नवीन पिढी तयार करण्याच्या कार्यात अग्रणी आहे. या कार्यक्रमासाठी कर्वेंच्या पुतळाल्या हार अर्पण करण्या साठी व अभिवादन करण्यासाठी संस्थचे संचालक मंडळाचे अध्यक्ष मान. मधुकर पाठक, ट्रस्टी मान. संदीप खर्डेकर, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मान. विनायक कराळे, सदस्य मान. दिघे, मान. शिल्पा पाठक, सचिव मान. शिवकुमार आणि संचालक प्रा. महेश ठाकूर उपस्थित होते. शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येत महान समाजसुधारक कर्वे यांना श्रद्धांजली अर्पण केली आणि त्यांचे कार्य व विचार यांचे स्मरण केले. या प्रेरणादायी प्रसंगी, भविष्यातील समाजकार्याच्या व्यावसायिकांना कर्वे यांच्या सेवा, समता आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांवर चालण्याची प्रेरणा मिळाली. सहा दशकांहून अधिक काळाच्या प्रवासात, कर्वे समाजकार्य संस्था कर्वे यांच्या मूल्यांची जोपासना करत सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या जबाबदार व्यावसायिकांची घडण घडवत आहे.

## उत्तर महाराष्ट्रात गारठा वाढला

**पुणे (आरंभ पर्व) :** किमान तापमानात घट होऊ लागल्याने राज्यात थंडी हळूहळू वाढत जाण्याचे संकेत आहेत. उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानाचा पारा 16 अंशांच्या खाली आल्याने गारठा वाढला आहे. उर्वरित राज्यात अद्याप थंडीची प्रतीक्षा आहे. शनिवारी धुळे येथील कृषी महाविद्यालयात राज्यातील नीचांकी 13.4 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्यात तापमानातील चढ-उतार सुरूच राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीमुळे या भागात उद्या रात्रीपर्यंत कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. ही प्रणाली तमिळनाडू आणि श्रीलंकेच्या किनाऱ्याकडे येण्याचे संकेत आहेत. पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे. आग्नेय अरबी समुद्रात लक्षद्वीप बेटांजवळ चक्राकार वाऱ्यांची स्थिती टिकून आहे. कोकणात उन्हाचा चटका अधिक असला तरी उर्वरित राज्यात कमाल तापमानात हळूहळू कमी होत आहे. राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यात किमान तापमानाचा पारा घसरू लागला आहे. मध्य महाराष्ट्रात पहाटेच्या वेळी गारठा वाढला आहे. राज्यात कमाल-किमान तापमानातील तफावत कायम आहे. राज्याच्या किमान तापमानात घट होत असली तरी थंडीची प्रतीक्षा आहे. शनिवारी सकाळपर्यंतच्या 24 तासांमध्ये डहाणू येथे राज्यातील उच्चांकी 36.1 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ व रत्नागिरी येथे कमाल तापमान 35 अंशांच्या पुढे आहे. तसेच मध्य महाराष्ट्रातील धुळ्यासह निफाड, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, महाबळेश्वर, पुणे येथे किमान तापमान 16 अंशांच्या खाली आले आहे. आज तापमानातील चढ-उतार कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

## पठारे मताधिक्क्याने निवडून येतील : आमदार रोहित पवार

**लोहगाव (आरंभ पर्व) :** वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील महाविकासआघाडीचे उमेदवार बापूसाहेब पठारे हे चाळीस हजारांच्या मताधिक्क्याने निवडून येतील. असा आत्मविश्वास आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला. पठारे यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. लोहगाव येथील श्री. संत तुकाराम महाराज मंदिराच्या प्रांगणात पवार यांची सभा पार पडली. या प्रसंगी बोलतांना पवार यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. पवार म्हणाले, ही विधानसभेची निवडणूक नसून दोन विचारांची लढाई आहे.

# उत्तर भारतीयांचा भीमराव तापकीर यांना जाहीर पाठिंबा!





## रवी किशन यांच्या उपस्थितीत भव्य प्रचार रॅलीला प्रचंड प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला विधानसभा मतदारसंघात भाजप महायुतीच्या उमेदवार भीमराव तापकीर यांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या भव्य प्रचार रॅलीने नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला आहे. सुप्रसिद्ध अभिनेते आणि भाजप खासदार रवी किशन यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रचार रॅलीत उत्तर भारतीय समाजाने भीमराव तापकीर यांना संपूर्ण पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. यावेळी माजी खासदार अमर साबळे, भाजप-महायुतीच्या वरिष्ठ नेते, स्थानिक पदाधिकारी, आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रॅलीतील जनसमुदायाचा उत्साह पाहून खडकवासला मतदारसंघ पुन्हा महायुतीच्या विजयाची नोंद करणार असल्याचा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना आमदार भीमराव तापकीर "उत्तर भारतीय बांधवांसह मतदारसंघातील सर्व नागरिकांनी महायुती सरकारच्या 'विकासाच्या प्रवाहात' सहभागी होण्यासाठी, 'कमळ' चिन्हाला मतदान करावे आणि पुन्हा एकदा महायुती सरकार स्थापन करण्यासाठी माझ्या हातात बळ द्यावे," असे भीमराव अण्णा तापकीर यांनी यावेळी सांगितले. रवी किशन यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे प्रचारात नवचैतन्य निर्माण झाले असून, खडकवासला मतदारसंघात भाजप महायुतीचा झेंडा अभिमानाने फडकणार, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग म्हणजे महायुतीच्या विजयाचा स्पष्ट संकेत दिसत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे !

### भव्य पदयात्रा आणि जनतेशी थेट संवाद

खडकवासला मतदारसंघातील उत्तमनगर, शिवणे, आणि परिसरातील नागरिकांसोबत थेट गाठीभेटी घेत, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्याचबरोबर विकासकामांचा आढावा सादर करत जनतेशी थेट संवाद साधण्यात आला.

### उत्तर भारतीयांचा उत्स्फूर्त पाठिंबा

रॅलीत उत्तर भारतीय समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला. या समाजाने भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून त्यांना विजयी करण्याचे आश्वासन दिले.

### श्री सद्गुरु शंकर महाराज पालखी सोहळा

धनकवडी बालाजी नगर येथे आयोजित श्री सद्गुरु शंकर महाराज प्रकट दिन पालखी सोहळ्यात खासदार रवी किशन आणि आ.भीमराव तापकीर यांनी सहभाग घेतला. त्यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधत सामाजिक एकतेचा संदेश दिला.

### महायुती सरकारचा विकासाचा धडाका

रॅलीदरम्यान महायुती सरकारच्या विकासकामांची माहिति नागरिकांना देत, 'कमळ' चिन्हासोबत असलेला प्रगतीचा आश्वासक संदेश मांडण्यात आला.

## खून करुन महिलेचा मृतदेह पलंगातील कप्प्यात ठेवला

**पुणे (दै. आरंभ पर्व)** घरात एकटीच असलेल्या महिलेचा खून करुन तिचा मृतदेह पलंगाच्या कप्प्यात लपवून ठेवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. हडपसर भागातील फुरसुंगी परिसरात ही घटना घडली आहे. महिलेचे खून कोणी केला आणि त्यामागचे कारण काय आहे, याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. स्वप्नाली उमेश पवार (वय 24, रा. अष्टविनायक कॉलनीजवळ, हुंडेकरी वस्ती, फुरसुंगी) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. स्वप्नाली यांचा खून करुन मृतदेह पलंगाच्या कप्प्यात ठेवल्याची माहिती फुरसुंगी पोलिसांना शुक्रवारी (ता. 9) रात्री मिळाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नाली यांचे पती उमेश मोटारचालक आहेत. ते शुक्रवारी (ता. 8) पहाटे पाचच्या सुमारास प्रवासी घेऊन बीडला गेले होते. शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास ते घरी परतले. तेव्हा घराला बाहेरून कडी होती. कडी उघडल्यानंतर पत्नी घरात दिसली नाही. त्यामुळे त्यांनी पत्नीचा शोध घेतला. मात्र, तिचा ठावठिकाणा लागला नाही. त्यांनी घरातील दागिने, रोकड, पत्नीचा मोबाईल शोधण्याचा प्रयत्न केला. दागिने, रोकड पलंगात ठेवली का? हे पाहण्यासाठी त्यांनी पलंग उघडला. तेव्हा त्यांना त्यात पत्नीचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर त्यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला याबाबतची माहिती दिली. त्यानंतर रात्रपाळीत गस्त घालणारे सहायक पोलिस निरीक्षक नानासाहेब जाधव, पोलिस उपनिरीक्षक खंदारे, विनोद पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. फुरसुंगी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक मंगल मोढवे यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनास्थळी अंगुली मुद्रा तज्ज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले होते.

## वारकरी दिंडीतून राज्यभर महाविकास आघाडीचा प्रचार

*राष्ट्रवादी आध्यत्मिक व वारकरी आघाडीतर्फे घुमणार 'रामकृष्ण हरी, वाजवा तुतारी' नाद*



**पुणे (दै. आरंभ पर्व)** राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडी, महाराष्ट्र राज्य संपूर्ण महाराष्ट्रभर भजन, कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रचार करणार आहे. या प्रचार वारीची शनिवारी पुण्यातील पत्रकार भवन येथून झाली. हरिनामाचा गजर करीत, वारकऱ्यांनी सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या महाविकास आघाडीला निवडून देण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडीचे प्रमुख हभप विठ्ठल (आबा) महाराज मोरे, राज्य उपाध्यक्ष हभप मुबारक महाराज शेख, संपर्कप्रमुख हभप सूरज महाराज लवटे, जिल्हाध्यक्ष हभप समाधान महाराज देशमुख, सोलापूर जिल्हाध्यक्ष हभप तुकाराम महाराज पाटील, आळंदी शहराध्यक्ष हभप दत्तात्रेय महाराज साबळे यांच्यासह टाळ, मृदुंग, वीणा घेऊन शेकडो वारकरी यामध्ये सहभागी झाले आहेत.

या प्रचार वारीचा रथ पुण्यातून पुढे सोलापूर, पंढरपूर, अहमदनगर, नाशिक, खानदेश आणि विदर्भात जाणार आहे. या वारीचा मुख्य उद्देश हा मतदारांना पुरोगामी विचारधारेने प्रेरित करण्यासह तत्कालीन सरकारच्या चुका लक्षात आणून देऊन महविकास आघाडीचे महत्व पटवून देणे हा आहे, असे हभप विठ्ठल (आबा) महाराज मोरे यांनी सांगितले.

विठ्ठल (आबा) महाराज मोरे पुढे बोलताना म्हणाले, "विद्यमान सरकार हे मनुवादी विचारांचे आहे. जाती, धर्मात भांडण लावण्याचा प्रयत्न सरकारमधील अनेक लोक करत आहेत. या धर्मांध, संविधान विरोधी सरकारच्या विरोधात आम्ही प्रचार करत आहोत. सर्वांना संतांच्या विचारांचे पालन करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षालाच मतदान करण्याचे आवाहन या वारीच्या माध्यमातून करत आहोत. सर्वांनी आपला मतदानाचा हक्क जरूर बजावावा."

"आध्यात्मिक व वारकरी आघाडीचा प्रचार वारीचा हा तिसरा टप्पा आहे. यापूर्वी दोन वेळा आम्ही महाराष्ट्र दौरा केला आहे. त्याचा देखील फायदा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला लोकसभेमध्ये झाला होता. विधानसभा निवडणुकीत संत विचारांना मानणारे मतदार महा विकास आघाडीच्या पाठीशी उभे राहतील," हभप मुबारक महाराज शेख यांनी सांगितले.

## पुणे विभागीय शिक्षण मंडळाच्या विभागीय संचालक पदी विकास जगताप यांची निवड

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या पुणे विभागीय मंडळावर शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या आदेशानुसार, नामनिर्देशित माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापकीय संस्थांच्या प्रतिनिधींमधून विकास शिवराम जगताप यांची संचालक म्हणून निवड झाली आहे. पुणे विभागाची कार्यकारी समिती ही कार्यकारी, आर्थिक आणि प्रशासकीय कार्यपद्धतीं बाबत नियम आणि कायदे तयार करण्यासाठी, आवश्यक असल्यास सुधारणा करण्यासाठी आणि इतर बाबींबाबत कर्तव्य पार पाडण्यासाठी निवडण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील दहावी, बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ते



मधील महत्त्वाचा टप्पा मानला जातात. या परीक्षा घेणार्या मंडळावर गेल्या अनेक वर्ष अशासकीय सदस्य नेमले गेले नव्हते. या अशासकीय सदस्यांच्या मार्गदर्शनामुळे परीक्षा योग्य रीतीने संपन्न होणे शक्य होते. या परीक्षेची गुणवत्ता, गोपनीयता व विश्वासार्हता वाढवण्यासाठी या संचालकांचे मार्गदर्शन उपयोगी ठरेल. ग्रामीण भागातील विद्यार्थी व संस्था चालकांना या परीक्षा घेताना येणाऱ्या अडचणी, आवश्यक असणाऱ्या सुविधा विकास जगताप हे ग्रामीण भागातील खंबेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव असल्यामुळे या प्रश्नांना ते आता मंडळाच्या बैठकीमध्ये वाचा फोडतील आणि ग्रामीण संस्था चालकांचाही आवाज बोर्डाच्या बैठकांमध्ये आता दणाणेल असा विश्वास खंबेश्वर शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ श्रीपाद ढेकणे, चेअरमन माणिकराव नागवडे, संस्थेचे संचालक उद्धव ढोले, ॲड राजेंद्र तांबे, शंकर नागवडे, लक्ष्मण भालसिंग, मुख्याध्यापक प्रकाश दौंड यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय संचालक पदी विकास जगताप यांची नियुक्ती झाल्याबद्दल परिसरातील अनेक मान्यवरांकडून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# बौद्ध लेण्यांचा, पर्यटन स्थळांचा विकास करणार - केंद्रीय मंत्री किरेन रिज्जुजी

**पुणे (दै. आरंभ पर्व)** जगात भारताची ओळख बुद्ध भूमी अशी आहे. जगातील प्रत्येक बौद्ध आपल्या देशात येऊन तथागत गौतम बुद्धाच्या चरणी लीन होऊ इच्छित असतो, बौद्ध स्थळांना भेटी देऊन त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न करतो मात्र या ठिकाणी भेटी दिल्या नंतर विदेशी नागरिकांना प्रश्न पडायचा या स्थळांचा, परिसराचा विकास भारत सरकार का करत नाही? परंतु मागी दहा वर्षात हे चित्र पालटले आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा बदल झाला आहे. महाराष्ट्रात अजिंठा - वेरूळ शिवाय अनेक




ठिकाणी बौद्ध लेण्या आहेत, या बौद्ध लेण्यांचा आणि बौद्ध पर्यटन स्थळांचा विकास केंद्र सरकार करणार असल्याची माहिती केंद्रीय अल्पसंख्यांक व संसदीय कार्यमंत्री किरेन रिज्जुजी यांनी दिली.

सम्यक विहार विकास केंद्र, भाऊ पाटील रोड बोपोडी येथे बौद्ध समाज बांधवांशी मुक्त संवाद..! या कार्यक्रमात किरेन रिज्जुजी बोलत होते. यावेळी परशुराम वाडेकर (अध्यक्ष, विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे), पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, भंते नागघोष थेरो, भंते थान (व्हिएतनाम), भंते यश, माजी नगसेविका चंद्रकांता सोनकांबळे, आनंद छाजेड, अविनाश कदम आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना केंद्रीय मंत्री किरेन रिज्जुजी म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच मी आज इथे आहे. देशातील एससी, एसटी, ओबीसी समाजाला न्याय देण्याचे काम भारतीय संविधान करते, बाबसाहेबांनंतर 70 वर्षांनी एका बौद्ध व्यक्तीला कायदा मंत्री होण्याचे भाग्य मला पंतप्रधान मोदी यांच्या मुळे लाभले. आज अल्पसंख्याक मंत्री त्यांनी मला दूरदृष्टीने केले आहे. कारण अन्य अल्पसंख्याक समाजांचाही विकास होणे आवश्यक आहे.

केंद्रीय मंत्री किरेन रिज्जुजी म्हणाले, आम्ही सत्तेत आल्यानंतर पहिल्यांदा दिल्लीत बौद्ध जयंती साजरी करण्यात आली, ही पानपरा आता मागील दहा वर्षांपासून सुरु आहे. भारतीय संविधानाला यंदा 75 वर्ष पूर्ण होत आहेत, यंनिमित 25 नोव्हेंबर पासून केंद्र सरकारच्या वतीने मोठ्या उत्साहात विविध कार्यकरमांचे आयोज करण्यात येणार असल्याचे सांगत त्यांनी भारतीय संविधानाला भाजप कडून कोणताही धोका नसल्याचेही स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना परशुराम वाडेकर म्हणाले, भारतीय संविधानाच्या प्रचार, प्रसारासाठी आम्ही विविध उपक्रम राबवत आहोत. संविधानाचे प्रास्ताविक घरोघरी, मोक्याच्या ठिकाणी, चौकात लावणे, जनजागृती करणे, इंटरनॅशनल संविधान दौड, शालेय विद्यार्थ्यांसाठी संविधान रन, पुणे महापलिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविला आहे. संविधान दिन साजरा करण्यासाठी केंद्र सरकारने देशभर त्या दिवशी सुटी जाहीर करावी अशी मागणी त्यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे केली, तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याणक्याकडे सुद्धा ही मागणी केल्याचे वाडेकर यांनी सांगितले.

काँग्रेस काळात अल्पसंख्याक मंत्रालय केवळ मुस्लिम मंत्रालय झाले होते

भारत देशात मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आणि पारसी या सहा धर्मांचे लोक अल्पसंख्याक आहेत. मात्र काँग्रेसने मुस्लिम अमाज वगळता अन्य कोणत्याही धर्मांच्या एकाही नेत्याला अल्पसंख्याक मंत्री केले नाही. अल्पसंख्याक मंत्रालय हे केवळ मुस्लिम मंत्रालय झाले होते अन्य धर्मियांकडे त्यांनी जाणीवपूरणक दुर्लक्ष केले. मुस्लिम समाजाकजे केवळ लांगूनचाळण करण्यासाठी त्यांना तो विभाग द्यायचा, मात्र विकास त्यांचाही होऊ द्यायचा नाही हे काँग्रेसचे धोरण होते अशी टीका केंद्रीय मंत्री किरेन रिज्जुजी यांनी केली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.